क्र. पोमसं /५ अ/स.सा.बदल्या -पोउपनि (फर्स्ट क्लास) /१२/२०१६
राज्य पोलीस मुख्यालय पोमसं यांचे कार्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई.
दिनांक :- २६ मे २०१६.

वाचा : १. महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०१४, व
२. महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश-२०१५, दि.१६/०२/२०१५.

* * * * *

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमूद अध्यादेशातील कलम २२ न (१) (क) (अ) अन्वये विहीत केलेल्या तरतुदीनुसार **पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर)** दर्जापर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदलीकरिता सक्षम प्राधिकारी पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेनुसार खालील विवरणपत्रातील **पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) यांच्या सर्वसाधारण बदल्या ह्या, विहीत कालावधी पूर्ण झाल्याने/प्रशासकीय कारणास्तव व विनंतीनुसार करण्यात येत आहेत:-**

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व (सेकंड क्लास मास्टर) | सद्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | ललित अमृतलाल गांधी | नवी मुंबई | ठाणे ग्रामीण | विहीत कालावधी पूर्ण झाल्याने |
| २. | एम.पी.सोंडेकर | रायगड | नवी मुंबई | विहीत कालावधी पूर्ण झाल्याने |
| ३. | ए.एच. सोलकर | रायगड | रत्नागिरी | विहीत कालावधी पूर्ण झाल्याने |
| ४. | एम.के.झेंडेकर | रायगड | नवी मुंबई | विहीत कालावधी पूर्ण झाल्याने |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशाची प्रत, आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशाची प्रत, उक्त पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) यांना व्यक्तीशः अदा करुन, त्या आदेशाच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन, त्या दिनांकित स्वाक्षरीच्या दुय्यम प्रती या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधीन असलेल्या उक्त** पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) यांना **बदलीवर सोडताना पर्यायी/बदलीवर येणाऱ्या पोलीस उप निरीक्षक (नौका विभाग)** यांची **वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) यांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दि.३१/०५/२०१६ पूर्वी (लक्षवेध कार्यासन क्र.५-अ) यांना लक्षवेध करुन** या कार्यालयास कळवावा.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांचे घटकात बदलून येणारे** जे पोलीस उप निरीक्षक **(फर्स्ट क्लास इंजिन चालक)** व पोलीस उप **निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) या आदेशानुसार बदलीवर नेमणुकीचे ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ५-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर कळवावीत. तसेच, **त्यांचे घटकातून बदलून जाणारे जे** पोलीस उप निरीक्षक **(फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्ण निवेदन करतील** अशा **पोलीस उप निरीक्षक** (फर्स्ट क्लास इंजिन चालक) व पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) **त्यांनी रुग्ण निवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात** यावे, आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवाल देखील या कार्यालयास **कार्यासन क्र. ५-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस उप निरीक्षक** (फर्स्ट क्लास इंजिन चालक) **व पोलीस उप निरीक्षक** (सेकंड क्लास मास्टर) **यांच्याविरुद्ध या कार्यालयाचे पत्र क्र.२/५५/०७, दि.१६/०९/१९८३, दि.११/०१/१९८४ व दि.१०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि.१३/०२/१९९७ मधील सुचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.५-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

५. बदलीचे आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रतः

पोलीस आयुक्त, नवी मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा.,पुणे.
पोलीस अधीक्षक, रायगड/ ठाणे / रत्नागिरी

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत सादर,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा.,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सुरक्षा, दादर, मुंबई.
पोलीस उपअधीक्षक, नौका विभाग, ठाणे.

प्रतः

कार्यासन अधिकारी, का.क्र.३अ/ ९/ ११/ २८/ ३६ व ४०.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.
(सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी)